**नि.फौ.प्र.क्र.५३४/२०२१**
सरकार वि. श्रध्दा
**नि. क्र.३८**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.७ यांची शपथेवर सरतपासणी सुरु**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | : | विकास अशोकराव टोंग |
| वय | : | ४३ वर्षे |
| व्यवसाय | : | नोकरी –पो.हेड कॉन्स्टेबल |
| राहणार | : | नागपूर. |

**सरतपासणी– सरकार तर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती चिंचोळकर यांच्याकडून**

१. मला प्रकरणात समंस मिळाले व मी आज या प्रकरणात साक्ष देण्यास हजर झालो. सन २०२० मध्ये मी नंदनवन पोलीस स्टेशन येथे नाईक पदावर कार्यरत होतो. अप.क्र.६८३/२०२० ची केस डायरी मला पुढील तपासाकरीता मिळाली होती. तपासा दरम्यान मी आरोपीस अटक केली असता आरोपीने फिर्यादीच्या घरी चोरीची कबुली दिली. मी आरोपीचे कबुली जबाब तिचेच सांगण्यानुसार नोंदविले. आता मला दाखविण्यात आलेला कबुली जबाब हा तोच असून त्यावर माझी, आरोपीची व पंचाची स्वाक्षरी आहे. त्यास **नि.क्र.३९** देण्यात येते. त्यानंतर मी आरोपीच्या सांगण्यानुसार व दाखविल्यानुसार प्रकरणातील मुददेमाल जप्त केला व पंचासमक्ष जप्ती पंचनामा तयार केला. मला आता दाखविण्यात आलेला जप्ती पंचनामा तोच आहे. त्यावर माझी व पंचाची सही आहे. सदर जप्ती पंचनाम्यास **नि.क्र.४०** देण्यात येते. त्यानंतर पुन्हा दि. २९.१०.२०२० रोजी आरोपीचे कबुली जबाब तिचेच सांगण्यानुसार नोंदविले. आता मला दाखविण्यात आलेला कबुली जबाब हा तोच असून त्यावर माझी, आरोपीची व पंचाची स्वाक्षरी आहे. त्यास **नि.क्र.४१** देण्यात येते. त्यानंतर मी आरोपीच्या सांगण्यानुसार व दाखविल्यानुसार प्रकरणातील मुददेमाल जप्त केला व पंचासमक्ष जप्ती पंचनामा तयार केला. मला आता दाखविण्यात आलेला जप्ती पंचनामा तोच आहे. त्यावर माझी व पंचाची सही आहे. सदर जप्ती

पंचनाम्यास **नि.क्र.४२** देण्यात येते. त्यानंतर फिर्यादीला बोलवून तिला मुदद्देमाल दाखविला व मुददेमालाचा ओळखपंचनामा तयार केला. मला आता दाखविण्यात आलेला ओळख पंचनामा तोच आहे. त्यावर माझी व पंचाची सही आहे. सदर ओळख पंचनाम्यास **नि.क्र.४३** देण्यात येते. त्यानंतर सर्व साक्षीदारांचे बयान त्यांच्या सांगण्यानुसार नोंदविले व तपासाअंती आरोपी विरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. मी आरोपीला बघीतल्यास ओळखु शकतो.

**उलटतपासणी – श्री. एस.एम.माटे वकील आरोपी करीता**

२. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला अटक केली नाही व कोणतिही विचारपुस केली नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने माझे समक्ष कोणतेही कबुली जबाब दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीकडुन काहीही जप्त केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी जप्त मुददेमाल फिर्यादीला दाखवून ओळख पंचनामा केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे जबाब त्यांचे सांगण्यानुसार नोंदविले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी विरुध्द खोटे दोषारोपपत्र दाखल केले व आज खोटी साक्ष देत आहे.

**फेरतपास – काही नाही**.

**श्रवणोत्तर स्वीकृत**

**माझे समक्ष,**

स्वा/–

दिनांकः– १६.०२.२०२६

(एस. एस. बोस )
मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर